**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची निवड

- भारतीय रिझर्व्ह बँकेचा चालू आर्थिक वर्षातला द्वैमासिक पतधोरणाचा दुसरा आढावा जाहीर / व्याजदर जैसे थे

- राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेटच्या कट ऑफ गुणांची वाढलेली पातळी ही परीक्षेचा स्पर्धात्मक दर्जा आणि परिक्षार्थींची वाढती तयारी यांचा परिणाम असल्याचा  राष्ट्रीय परीक्षा संस्थेचा खुलासा

- आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेत स्कॉटलंडचा नामिबियावर ५ गडी राखून विजय

**आणि**

- नैर्ऋत्य मोसमी पावसाची कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा आणि  आंध्रप्रदेश किनारपट्टीच्या आणखी काही भागात आगेकूच

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची आज निवड झाली. रालोआच्या नवनिर्वाचित खासदारांची बैठक आज नवी दिल्लीत संसद भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात झाली. संरक्षण मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंग यांनी नरेंद्र मोदी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. मोदी यांच्या नेतृत्वात भारताने विलक्षण प्रगती केली असून यापुढेही ही वाटचाल यशस्वी होण्याकरता नरेंद्र मोदी ह्यांचंच नेतृत्व योग्य राहील असं ते म्हणाले.  अमित शहा,

नितीन गडकरी, जनता दल सेक्युलरचे एच डी कुमारस्वामी, तेलुगु देसमचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू, जनता दल संयुक्तचे अध्यक्ष नीतिशकुमार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, लोक जनशक्ती पक्षाचे चिराग पासवान, हिंदुस्तान अवाम मोर्चाचे अध्यक्ष जितनराम मांझी, अपना दलच्या अनुप्रिया पटेल, जनसेना पक्षाचे पवन कल्याण यांनी प्रस्तावाला अनुमोदन दिलं. सलग तिसऱ्यांदा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सर्व नवनिर्वाचित खासदार तसंच भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीदेखील या बैठकीला उपस्थित होते. विजयी खासदारांचं अभिनंदन आणि स्वागत प्रधानमंत्र्यांनी केलं. मतदारांचे आणि निवडणुकीत अहोरात्र मेहनत घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे त्यांनी आभार मानले. रालोआला २२ राज्यांमधे सरकारस्थापनेची संधी जनतेने दिली असून तिथे अनुसूचित जमातींची लोकसंख्या जास्त आहे. आपल्या भाषणात मोदी म्हणाले......

**बाईट- मोदी**

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीतल्या यशाबद्दल युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. तसंच नवीन सरकारच्या स्थापनेला शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी युक्रेनला भेट देण्याचं त्यांना आमंत्रणही दिलं आहे.

दोन्ही देशांमधलं सहयोग कायम रहावा आणि भारतीय जनतेच्या हितासाठी त्याचा उपयोग व्हावा अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. येत्या जागतिक शांतता शिखर परिषदेत भारताचा सहभाग महत्वपूर्ण आहे असंही त्यांनी मोदी यांच्याबरोबरच्या दूरध्वनीवरून झालेल्या संभाषणात अधोरेखित केलं.

**<><><><><>**

संयुक्त जनता दल संसदीय पक्षाची बैठक पक्षाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानी आज झाली. संयुक्त जनता दलाचे नेते लालन सिंह, संजय कुमार झा, अजय कुमार मंडल, विजय लक्ष्मी कुशवाहा यांच्यासह पक्षाचे इतर नेते या बैठकीला उपस्थित होते.

दरम्यान, लोक जनशक्ती पक्ष राम विलास संसदीय पक्षाची बैठकही नवी दिल्लीत पार पडली. या बैठकीत पक्षाचे अध्यक्ष चिराग पासवान यांची पक्षाच्या संसदीय समितीच्या नेतेपदी निवड झाली.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज चालू आर्थिक वर्षातला द्वैमासिक पतधोरणाचा दुसरा आढावा जाहीर केला. सलग आठव्यांदा रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय बँकेनं घेतला आहे. त्यामुळे आता स्थायी ठेवींवरचा व्याजदर सव्वा-सहा टक्के, तर मुदत ठेवींवरचा व्याजदर आणि बँकेद्वारे आकारला जाणारा व्याजदर पावणे-सात टक्के इतका राहील.

आर्थिक विकासाला चालना देताना, चलनफुगवट्याचा दर आटोक्यात रहावा, यासाठी बँकेद्वारे केला जाणारा वित्तपुरवठा सीमित ठेवण्याचा निर्णयही पतधोरण समितीनं बहुमतानं पारित केला. महागाईचा दर आणि विकास दरात समतोल साधला जात असल्याचं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी पतधोरण जाहीर करताना सांगितलं. रिझर्व्ह बँकेचं पतधोरण महागाई आटोक्यात ठेवणारं आणि महागाईचा दर दीर्घकाळ ४ टक्क्यांवर स्थिर ठेवण्यासाठी वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. ग्राहक भाव निर्देशांकावर आधारित महागाईचा दर, दोन्ही बाजूंनी २ टक्के फरकासह ४ टक्क्यांवर स्थिर राहील याची रिझर्व बँकेनं दक्षता घ्यावी, असे निर्देश सरकारनं दिल्याचं ते म्हणाले. यंदाचा मान्सून सर्वसामान्य

राहील, या अपेक्षेनं वाढती महागाई आटोक्यात ठेवण्याचा पतधोरण समितीचा प्रयत्न राहील असं शक्तिकांत दास यांनी सांगितलं.

दरम्यान, चालू आर्थिक वर्षात विकास दर पूर्वीच्या अंदाजापेक्षा जास्त, म्हणजे ७ पूर्णांक २ दशांश टक्के इतका राहील, असा भारतीय रिझर्व बँकेचा अंदाज आहे. यापूर्वी तो ७ टक्के राहील असा अंदाज होता.

**<><><><>**

श्रीलंकेच्या कर्जबाजारीपणावर केलेल्या उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम दिसत असून, तिथल्या आर्थिक सुधारणांमधून ते स्पष्ट होत आल्याचं आयएमएफ, अर्थात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं म्हटलं आहे. श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेतल्या सुधारणांकडे आयएमएफ चं लक्ष असून, बाहेरच्या व्यावसायिक कर्जदारांबरोबरचे करार, आणि अधिकृत कर्जदारांबरोबरच्या करारांना मूर्त रूप देणं, यासारख्या घडामोडींचा यात समावेश असल्याचं श्रीलंकेच्या अर्थमंत्र्यांनी सामाज माध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><>**

राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेटच्या कट ऑफ गुणांची वाढलेली पातळी ही परीक्षेचा स्पर्धात्मक दर्जा आणि परिक्षार्थींची वाढती तयारी यांचा परिणाम आहे, असं स्पष्टीकरण राष्ट्रीय परीक्षा संस्थेने दिलं आहे. या परिक्षेत सदुसष्ठ विद्यार्थ्यांना संपूर्ण गुण मिळाल्याबद्ल निर्माण झालेल्या संभ्रमावर संस्थेने हे स्पष्टीकरण दिलं. त्याचप्रमाणे परीक्षेचा नवीन आणि आधीचा अभ्यासक्रम यातल्या फरकामुळे एकाऐवजी दोन्ही पर्यायांना गुण देण्याचा निर्णय तज्ज्ञांनी घेतल्यामुळेही गुणांमध्ये वाढ झाल्याचं संस्थेनं म्हटलं आहे. या परीक्षेत काही केंद्रांवर गैरव्यवहार झाल्याचा समज निराधार असल्याचा निष्कर्ष संस्थेने त्या केंद्रांवरची सीसीटीव्ही फूटेज बघून काढला असल्याचंही संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज झालेल्या सामन्यात स्कॉटलंडनं नामिबियाचा ५ गडी राखून पराभव केला. नामिबियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि निर्धारित २० षटकांमध्ये ९ गडी गमावून १५५ धावा केल्या. स्कॉटलंडनं हे आव्हान १८ षटकं आणि ३ चेंडूंतच ५ गड्यांच्या मोबदल्यात १५७ धावा काढून पूर्ण केलं. या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना कॅनडा आणि आयर्लंड यांच्यात रात्री ८ वाजता सुरू होणार आहे.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसानं मध्य अरबी समुद्र, कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश किनारपट्टीच्या आणखी काही भागात तसंच बंगालच्या उपसागराच्या बहुतेक सर्व भागात प्रवेश केल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

त्यामुळे पुढल्या २४ तासांत महाराष्ट्रात कोकण तसंच गोवा, गुजरात, आंध्रप्रदेश आणि तेलंगणामध्ये अनेक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं या ठिकाणी येलो अलर्ट जारी केला आहे. या काळात ईशान्य भारत, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज आहे. वायव्य भारतासह, जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये देखील पुढले २ ते ३ दिवस पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

महाराष्ट्रात लातूर जिल्ह्यात आज मान्सूनपूर्व पावसानं जोरदार हजेरी लावली. नांदेड जिल्ह्यात बिलोली तालुक्यात काल वीज पडून एक जण मृत्युमुखी पडला.

दरम्यान, उत्तरप्रदेशचा काही भाग, मध्यप्रदेश, झारखंड, पंजाब, हरियाणा, बिहार अनं ओदिशा मध्ये पुढले २ ते ३ दिवस उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**